SAMPLE CONTENT

Perfect

# इतिहास व नागरिकशास्त्र

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित



## इयत्ता आठवी

मराठी माध्यम

मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित

# PERFECT
# इतिहास व नागरिकशास्त्र
## इयत्ता आठवी (मराठी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठाच्या आकलनाकरता पाठातील संकल्पना / पारिभाषिक शब्द, घटनाक्रम व पाठ परिचय अंतर्भूत.
- विविध प्रश्नप्रकारांचा समावेश.
- पाठाधारित प्रश्न व सरावासाठी अधिक प्रश्नांचा समावेश.
- प्रत्येक पाठाच्या शेवटी पाठाची उजळणी Q.R. Code द्वारे उपलब्ध.
- 'ज्ञानाचे उपयोजन' या शीर्षकाखाली पाठांतर्गत प्रश्न व उपक्रम यांचा समावेश.

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 **TEID: 2192** P.O. No. 3000

# प्रस्तावना

नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,

शिक्षण मंडळाने ज्ञानरचनावादावर आधारित तयार केलेल्या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांची वैचारिक क्षमता व निरीक्षण क्षमता वाढीस लागेल. विद्यार्थ्यांची आकलन व उपयोजन क्षमता विकसित करणाऱ्या या अभ्यासक्रमाचे विश्लेषण करून तयार केलेल्या टार्गेट प्रकाशनाचे '**Perfect इतिहास व नागरिकशास्त्र इयत्ता आठवी'** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

पाठाच्या सुरुवातीला पाठाच्या आकलनाकरता पाठातील संकल्पना / पारिभाषिक शब्द व घटनाक्रम व पाठाचा परिचय दिला आहे. विषयाची व्यापकता लक्षात घेता पाठाधारित प्रश्न व अधिकचे प्रश्नही देण्यात आले आहेत. पाठाच्या ओघानुसार प्रश्नांचा क्रम हे टार्गेटच्या पुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. यामध्ये विविध प्रश्नप्रकारांचा समावेश केला आहे. कालरेषा पूर्ण करा, तक्ता पूर्ण करा, संकल्पनाचित्र पूर्ण करा, यांसारखे प्रश्न प्रत्येक पाठात समाविष्ट करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचा या विषयाचा अभ्यास सविस्तरपणे व रंजक व्हावा यासाठी पाठ्यपुस्तकात पाठांतर्गत प्रश्न व उपक्रम दिलेले आहेत. 'ज्ञानाचे उपयोजन' या शीर्षकाखाली हे सर्व प्रश्न सोडवून दिले आहेत, तसेच उपक्रम सोडवण्यासाठी मार्गदर्शनपर मुद्दे व संकेतस्थळांचे संदर्भ देण्यात आले आहेत.

अभ्यास प्रक्रियेमध्ये महत्त्वाचा टप्पा असतो तो म्हणजे स्वत:ला जोखण्याचा. त्यासाठीच प्रत्येक पाठाच्या शेवटी विद्यार्थ्यांना परीक्षेचा सराव व स्वयंमूल्यांकनासाठी उपयुक्त ठरेल अशी 'पाठाची उजळणी' Q.R Code मार्फत उपलब्ध करून दिली आहे.

या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा इतिहास व नागरिकशास्त्र या विषयाबाबतचा दृष्टिकोन अधिक व्यापक होईल, तसेच या विषयातील रुची वाढेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

हे पुस्तक परिपूर्ण होण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.
mail@targetpublications.org

**इतिहासासारखा दुसरा शिक्षक नाही!**

**ज्ञानार्थींना खूप खूप शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'इतिहास व नागरिकशास्त्र; पुनर्मुद्रण: फेब्रुवारी २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# ठळक वैशिष्ट्ये

### संकल्पना / पारिभाषिक शब्द

पाठाचे आकलन सहज व्हावे याकरता पाठाच्या सुरुवातीला पाठात समाविष्ट महत्त्वाच्या संकल्पना, तसेच विषयाच्या दृष्टीने पारिभाषिक शब्द स्पष्ट केलेले आहेत.

### घटनाक्रम

पाठातील घटनांचे कालानुक्रमे आकलन होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार पाठाच्या सुरुवातीला घटनाक्रम देण्यात आला आहे.

### पाठाचा परिचय

'पाठाचा परिचय' शीर्षकांतर्गत मुद्द्यांच्या स्वरूपात पाठाचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

### विविध प्रश्नप्रकार अंतर्भूत

संपूर्ण पाठ प्रश्नोत्तराच्या स्वरूपात देण्यात आला आहे. यामध्ये पाठ्यपुस्तकात स्वाध्यायांतर्गत दिलेल्या विविध प्रश्न प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

### मुद्द्यांच्या स्वरूपात उत्तरे

विद्यार्थ्यांना आशयाचे सहजतेने आकलन व्हावे यादृष्टीने सर्व प्रश्नांची उत्तरे मुद्द्यांच्या स्वरूपात देण्यात आली आहेत.

### पाठांतर्गत प्रश्न

'ज्ञानाचे उपयोजन' या शीर्षकांतर्गत करून पाहा, सांगा पाहू यांसारख्या पाठांतर्गत प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश केला आहे.

### उपक्रम

आवश्यकतेनुसार उपक्रम सोडवून दिले आहेत. सोबत त्यासंबंधितचे संदर्भही देण्यात आले आहेत.

### पाठाची उजळणी

पाठासंदर्भात मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने पाठाची उजळणी Q. R. Code द्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्रमांक | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **इतिहास** | |
| १ | इतिहासाची साधने | १ |
| २ | युरोप आणि भारत | ८ |
| ३ | ब्रिटिश सत्तेचे परिणाम | १८ |
| ४ | १८५७ चा स्वातंत्र्यलढा | २५ |
| ५ | सामाजिक व धार्मिक प्रबोधन | ३२ |
| ६ | स्वातंत्र्य चळवळीच्या युगास प्रारंभ | ३९ |
| ७ | असहकार चळवळ | ४९ |
| ८ | सविनय कायदेभंग चळवळ | ५७ |
| ९ | स्वातंत्र्यलढ्याचे अंतिम पर्व | ६४ |
| १० | सशस्त्र क्रांतिकारी चळवळ | ७३ |
| ११ | समतेचा लढा | ८० |
| १२ | स्वातंत्र्यप्राप्ती | ८९ |
| १३ | स्वातंत्र्यलढ्याची परिपूर्ती | ९४ |
| १४ | महाराष्ट्र राज्याची निर्मिती | १०० |
| | **नागरिकशास्त्र** | |
| १ | संसदीय शासन पद्धतीची ओळख | १०६ |
| २ | भारताची संसद | ११० |
| ३ | केंद्रीय कार्यकारी मंडळ | ११५ |
| ४ | भारतातील न्यायव्यवस्था | १२० |
| ५ | राज्यशासन | १२५ |
| ६ | नोकरशाही | १२९ |


**[टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.**
**पाठ्यपुस्तकात उल्लेख केलेल्या प्रधानमंत्री या शब्दाचा मराठी भाषेनुसार पंतप्रधान असा शब्दप्रयोग केला जातो.]**

Sample Content

# १ इतिहासाची साधने

| संकल्पना / पारिभाषिक शब्द | |
|---|---|
| आधुनिक भारताचा इतिहास | इसवी सन १७०७ ते वर्तमानातील घटनांचा अभ्यास. |
| भौतिक साधने | सर्व प्रकारच्या कलाकृती, वस्तू, वास्तू किंवा त्यांचे अवशेष ज्यातून आपल्याला भूतकाळाची माहिती मिळते. उदा. प्राणी आणि वनस्पतींचे जीवाश्म, कलाकृती, इमारती, किल्ले इत्यादी. |
| लिखित साधने | असे साहित्य जे विविध ऐतिहासिक कालखंडांचा इतिहास जाणून घ्यायला मदत करते. उदा. ताम्रपत्र, अधिकृत नोंदी, वैयक्तिक पत्रव्यवहार, दैनंदिनी, ऐतिहासिक पुस्तके, हस्तलिखिते इत्यादी. |
| मौखिक साधने | असे साहित्य जे लिखित स्वरूपात नसते, तर एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तोंडी हस्तांतरित केले जाते. उदा. लोकगीते, लोककथा, ओव्या, पोवाडे इत्यादी. |
| अभिलेखागार | यात सार्वजनिक नोंदी किंवा इतर ऐतिहासिक कागदपत्रे जतन करून ठेवली जातात. |
| संस्थानिक | १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्याच्या अंमलबजावणीपूर्वी स्थानिक भारतीय राजे ज्यांची शासन असलेली राज्ये अस्तित्वात होती. |
| दर्शनी पाटी | एखादी व्यक्ती किंवा घटनेच्या स्मरणार्थ बांधलेल्या पुतळ्याजवळ भिंतीवर किंवा तत्सम पृष्ठभागावर लावलेली धातू, पोर्सेलेन किंवा लाकडाची नक्षीदार पाटी. |
| नियतकालिके | नियमित अंतराने प्रकाशित होणारे. |
| पोवाडा | पराक्रमी स्त्री-पुरुषांच्या शौर्याचे अत्यंत जोशपूर्ण व स्फूर्तिदायी असे नाट्यपूर्ण निवेदन. |

## पाठाचा परिचय

**इतिहासाची साधने**

- **भौतिक साधने**
  - **इमारती व वास्तू:** ब्रिटिशकालीन प्रशासकीय कचेऱ्या, क्रांतिकारकांची निवासस्थाने, तुरुंग, किल्ले इत्यादी.
  - **पुतळे आणि स्मारके:** विविध नेत्यांचे पुतळे, हुतात्मा स्मारके.
- **लिखित साधने**
  - **वृत्तपत्रे व नियतकालिके:** ज्ञानोदय, केसरी, दीनबंधु इत्यादी वृत्तपत्रे, प्रभाकरसारखी साप्ताहिके इत्यादी.
  - **नकाशे व आराखडे:** ब्रिटिश काळात स्थापन झालेल्या सर्व्हे ऑफ इंडिया या स्वतंत्र विभागाने तयार केलेले भारताचे, भारतातील विविध प्रांतांचे, शहरांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार केलेले नकाशे. तसेच, वास्तुविशारद व अभियंत्यांनी तयार केलेले इमारतींचे आराखडे.
- **मौखिक साधने**
  - **स्फूर्तिगीते:** स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील स्फूर्तिगीते.
  - **पोवाडे:** १८५७ चा स्वातंत्र्यलढा, विविध क्रांतिकारकांचा पराक्रम, शोषितवर्गाची जागृती यासंबंधित तयार केलेले पोवाडे
- **दृक्, श्राव्य आणि दृक्-श्राव्य साधने**
  - **छायाचित्रे:** व्यक्ती, घटना, वस्तू व वास्तुसंबंधित छायाचित्रे.
  - **ध्वनिमुद्रिते (रेकॉर्ड्स):** नेत्यांची भाषणे, गीते यांची ध्वनिमुद्रिते.
  - **चित्रपट:** विविध प्रसंगांसंबंधित ध्वनी चित्रफिती.

Sample Content

## दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

*१. इतिहासाच्या साधनांमधील ________ साधने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | लिखित | ब. | मौखिक |
| क. | भौतिक | ड. | दृक-श्राव्य |

२. अंदमान येथील ________ ला भेट दिल्यावर आपल्याला वि. दा. सावरकर यांच्या क्रांतिकारी कार्याची माहिती मिळते.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | आगा खान पॅलेस | ब. | साबरमती आश्रम |
| क. | सेल्युलर जेल | ड. | लक्ष्मी विलास पॅलेस |

*३. पुण्यातील ________ या गांधी स्मारक संग्रहालयात गांधीजींच्या इतिहासाविषयी माहिती मिळते.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | आगाखान पॅलेस | ब. | साबरमती आश्रम |
| क. | सेल्युलर जेल | ड. | लक्ष्मी विलास पॅलेस |

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ________ हे पाक्षिक जानेवारी १९२० मध्ये सुरू केले.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | निबंधमाला | ब. | शतपत्रे |
| क. | केसरी | ड. | मूकनायक |

५. ________ ही इतिहासाची श्राव्य स्वरूपाची साधने आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | वर्तमानपत्रे | ब. | छायाचित्र |
| क. | ध्वनिमुद्रिते | ड. | चित्रपट |

*६. विसाव्या शतकातील आधुनिक तंत्रज्ञानाचा एक आगळा आविष्कार म्हणजे ________ होय.


| | | | |
|---|---|---|---|
| अ. | पोवाडा | ब. | छायाचित्र |
| क. | मुलाखती | ड. | चित्रपट |

**उत्तर:**


| | | | |
|---|---|---|---|
| १. | दृक-श्राव्य | २. | सेल्युलर जेल |
| ३. | आगाखान पॅलेस | ४. | मूकनायक |
| ५. | ध्वनिमुद्रिते | ६. | चित्रपट |

## संकल्पना चित्रे पूर्ण करा.


१.





*२.





३.




४.




५.




**उत्तर:**

१. i. भौतिक साधने ii. लिखित साधने
iii. मौखिक साधने
iv. दृक्, श्राव्य आणि दृक्-श्राव्य साधने

२. i. विविध वस्तू (कलाकृती) ii. ऐतिहासिक वास्तू
iii. संस्थानिकांचे राजवाडे iv. नाणी
v. पदके vi. पुतळे
vii. स्मारके viii. संग्रहालये

३. i. पत्रव्यवहार
ii. परदेशी व्यक्तींच्या नोंदी
iii. वृत्तपत्रे
iv. चरित्रे
v. नियतकालिके
vi. फॅक्टरी रेकॉर्ड्स्
vii. आत्मचरित्रे
viii. पुस्तके

Sample Content

४. i. स्फूर्तिगीते ii. लोकगीते
iii. पोवाडे iv. लोककथा
v. प्रसंगवर्णने vi. मुलाखती
vii. मेळे, जलसे, कलापथके
viii. ओव्या

५. i. छायाचित्रे ii. ध्वनिमुद्रिते (रेकॉर्डस्)
iii. चित्रपट

### नावे लिहा.

१. ब्रिटिश काळात नकाशे तयार करण्यासाठी स्थापन झालेला स्वतंत्र विभाग.

२. १९१३ मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीची मुर्हूतमेढ रोवणारे.

**उत्तर:** १. द सर्व्हे ऑफ इंडिया
२. दादासाहेब फाळके

### थोडक्यात उत्तरे लिहा. (२५ ते ३० शब्दांत)

**१. आधुनिक कालखंडात बांधल्या गेलेल्या इमारती आणि वास्तू कशाप्रकारे आधुनिक भारतीय इतिहासाची महत्त्वाची साधने ठरतात?**

**उत्तर:**

i. आधुनिक भारतीय इतिहासाचा कालखंड हा युरोपीय खासकरून ब्रिटिश राज्यकर्ते आणि संस्थानिकांच्या राज्यकारभाराचा काळ म्हणून मानला जातो.

ii. त्या काळात बांधलेले विविध पूल, रस्ते, इमारती आजही सुस्थितीत असलेल्या पाहायला मिळतात. त्यातील काही राष्ट्रीय स्मारके म्हणून घोषित करण्यात आली आहेत, तर काहींचे रूपांतर संग्रहालयात करण्यात आले आहे.

iii. या वास्तूंना भेटी दिल्यावर आपल्याला तत्कालीन इतिहास, स्थापत्यशास्त्र, वास्तूच्या स्थितीवरून त्या काळातील आर्थिक संपन्नता यांची माहिती मिळते.

iv. त्याचप्रमाणे, त्या काळातल्या क्रांतिकारकांचे आणि इतर प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांचे आयुष्य यांच्याविषयी माहिती मिळू शकते. उदा.

अ. अंदमान येथील सेल्युलर जेल ज्याचे आता संग्रहालयात रूपांतर करण्यात आले आहे. यात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या क्रांतिकार्याची माहिती मिळते.

ब. त्याचप्रमाणे, मुंबईतील मणिभवन किंवा वर्धा येथील सेवाग्राम आश्रम येथे गांधी युगाच्या पर्वाची माहिती मिळू शकते.

क. तसेच पुण्यातील आगाखान पॅलेस येथे महात्मा गांधींच्या जीवनाविषयक माहिती मिळते.

अशारीतीने, आधुनिक कालखंडात बांधलेल्या इमारती आणि वास्तू या आधुनिक भारतीय इतिहासाची महत्वाची साधने ठरतात.

**२. आधुनिक भारतीय इतिहासाच्या अभ्यासात स्मारके कशाप्रकारे महत्त्वाची साधने ठरतात?**

**उत्तर:**

i. अनेक असामान्य व्यक्तींची स्मारके ही स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात पुतळ्यांच्या स्वरूपात उभारली गेली.

ii. या विविध पुतळ्यांच्या माध्यमातून आपल्याला त्या काळातील राज्यकर्ते, तसेच समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींविषयी माहिती मिळते.

iii. तसेच, या व्यक्तींचे संपूर्ण नाव, जन्म-मृत्यूची नोंद, व्यक्तीचे थोडक्यात कार्य, जीवनपट यांविषयीची माहिती पुतळ्याच्या दर्शनी पाटीवर पाहायला मिळते.
उदा. महात्मा जोतिराव फुले, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे.

iv. तसेच, अनेक घटनांच्या स्मरणार्थ उभारलेली स्मारके ही सुद्धा संबंधित घटना, घटना काळ व त्या घटनेशी संबंधित व्यक्ती यांची माहिती देतात.
उदा. विविध ठिकाणची हुतात्मा स्मारके.

अशारीतीने, स्मारके आधुनिक इतिहासाच्या अभ्यासासाठी महत्त्वाची साधने ठरतात.

**३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या वर्तमानपत्रांविषयी लिहा.**

**उत्तर:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली विविध वर्तमानपत्रे खालीलप्रमाणे आहेत:

i. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जानेवारी १९२० मध्ये 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. त्यांना उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला जावे लागल्याने त्यांनी या वृत्तपत्राचा कारभार आपल्या सहकाऱ्यांवर सोपवला.

ii. एप्रिल १९२७ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत भारत'हे वृत्तपत्रसुद्धा सुरू केले. यात त्यांनी सर्वसामान्य जनतेचे प्रबोधन आणि संघटन करण्याच्या दृष्टीने लिखाण केले.

iii. तसेच, 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' ही इतर दोन वृत्तपत्रेही त्यांनी सुरू केली.

### टिपा लिहा. / संकल्पना स्पष्ट करा.

***१. वस्तुसंग्रहालये आणि इतिहास**

**उत्तर:**

i. इतिहासाच्या भौतिक साधनांमध्ये विविध वस्तू, वास्तू, नाणी, पुतळे इत्यादी साधनांचा समावेश होतो.

ii. यातील काही वास्तू व इमारती आजही पाहायला मिळत असून काही इमारतींमध्ये संग्रहालये उभारण्यात आली आहेत. उदा. अंदमान येथील सेल्युलर जेल.

iii. इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वस्तुसंग्रहालयांमधून विविध वस्तू, चित्र, छायाचित्र इत्यादी गोष्टींचे जतन केलेले असते.

Sample Content

iv. काही वस्तुसंग्रहालये एखाद्या विशिष्ट व्यक्तीशी निगडित असलेल्या वस्तू, कागदपत्रे यांचे जतन करतात. यामुळे, अशा संग्रहालयांना भेटी देऊन आपल्याला त्या व्यक्तींविषयी अधिक माहिती मिळवायला मदत होते.
उदा. पुण्यातील आगाखान पॅलेस येथे महात्मा गांधींच्या जीवनाविषयीची माहिती देणाऱ्या विविध वस्तू आणि दस्तऐवज यांचे जतन करून ठेवले आहे.

**२. पोवाडा**

**उत्तर:**

i. पोवाडा हा इतिहासातील एखादी महत्त्वाची घटना किंवा एखाद्या व्यक्तीचे कार्य यांचे वर्णन करणारे इतिहासाचे महत्त्वाचे मौखिक साधन आहे.

ii. ब्रिटिश राजवटीत १८५७ चा स्वातंत्र्यलढा, क्रांतिकारकांचे पराक्रम यांवर पोवाडे रचले गेले. पोवाड्यांमुळे लोकांमध्ये चैतन्य आणि प्रेरणा निर्माण व्हायला मदत होत असे.

iii. शोषित समाजाची जागृती करण्यासाठी सत्यशोधक समाजाच्या कार्याची गाथा सांगणारे पोवाडे रचले गेले.

iv. याव्यतिरिक्त, संयुक्त महाराष्ट्र लढा यासारख्या इतर घटनांवरदेखील पोवाडे रचले गेले.

***३. छायाचित्रे**

**उत्तर:**

i. आधुनिक भारतीय इतिहासाची छायाचित्रे ही दृक् स्वरूपाची साधने आहेत.

ii. छायाचित्रण कलेचा शोध लागल्यामुळे विविध व्यक्ती, वस्तू, वास्तू इत्यादींचे छायाचित्रे घेणे शक्य होऊ लागले.

iii. छायाचित्रांद्वारे एखादी व्यक्ती, घटना, वस्तू, रचना इत्यादींची दृश्य स्वरूपात माहिती मिळते.

iv. उदा. मध्ययुगीन काळात व्यक्ती कशा दिसत असत किंवा घडून गेलेल्या घटना यांची चित्रे उपलब्ध आहेत; पण या चित्रांच्या विश्वासार्हतेविषयी शंका उपस्थित केल्या जातात. त्या तुलनेत छायाचित्रे ही अधिक विश्वसनीय मानली जातात.

v. एखाद्या व्यक्तीच्या छायाचित्रावरून तिचे दिसणे, पेहराव यांबद्दल माहिती मिळते, तर एखाद्या प्रसंगाच्या छायाचित्रावरून ती संबंधित घटना आपल्या नजरेसमोर उभी राहते.

vi. त्याचप्रमाणे वस्तू किंवा वास्तूच्या छायाचित्रांद्वारे त्यांचे स्वरूप आपल्या लक्षात यायला मदत होते.

***४. श्राव्य साधने**

**उत्तर:**

i. आधुनिक काळातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ध्वनिमुद्रण तंत्राचा महत्त्वाचा शोध लागला. जे इतिहासाचे महत्त्वाचे श्राव्य साधन ठरले आहे.

ii. आधुनिक काळातील नेते आणि प्रतिष्ठित व्यक्ती यांची भाषणे, गाणी इत्यादी ध्वनिमुद्रित केलेली आहेत. भविष्यात ही ध्वनिमुद्रिते सहज उपलब्ध होऊ शकतात आणि इतिहासाची साधने म्हणून वापरली जाऊ शकतात.

iii. उदा. रवींद्रनाथ टागोरांनी गायलेले 'जन गण मन' हे आपले राष्ट्रगीत आणि सुभाषचंद्र बोस यांचे भाषण जे ध्वनिमुद्रित केले गेले होते, आज त्यांचा वापर आधुनिक भारतीय इतिहासाच्या अभ्यासात श्राव्य साधने म्हणून करता येतो.

## पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

***१. ब्रिटिश काळात वृत्तपत्रे सामाजिक प्रबोधनाची साधने म्हणूनही काम करत होती.**

**उत्तर:**

i. वृत्तपत्रे आपल्याला समकालीन घटनांची माहिती तर देतात. त्याचबरोबर मान्यवर तज्ञ मंडळींची मतमतांतरे, अग्रलेख, एखाद्या घटनेचे विस्तृत आणि सखोल असे विश्लेषण इत्यादी वृत्तपत्रे प्रसिद्ध करतात.

ii. वृत्तपत्रांतून आपल्याला त्या काळातील राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक घडामोडींची माहिती मिळते.

iii. ब्रिटिश राजवटीतील वृत्तपत्रांद्वारे ब्रिटिश सरकारची धोरणे आणि त्यांचे भारतावरील परिणाम यांचा अभ्यास करता येतो.

iv. स्वातंत्र्यपूर्वकाळात 'ज्ञानोदय', 'दीनबंधु', 'अमृतबझार पत्रिका', 'ज्ञानप्रकाश', 'केसरी' यांसारखी प्रमुख वृत्तपत्रे लोकजागृतीची महत्त्वाची साधने ठरली होती.

v. तसेच, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'निबंधमाला' आणि लोकहितवादी उर्फ गोपाळ हरी देशमुख यांच्या 'प्रभाकर' या साप्ताहिकांतून लिखित 'शतपत्रे' यांद्वारे विविध सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवर भाष्य करण्यात आले.

vi. डॉ. आंबेडकरांनीही बहिष्कृत भारत या पत्रातून सामान्य जनतेच्या प्रबोधन व संघटनेसाठी लिखाण केले. शिवाय, जनता व प्रबुद्ध भारत ही आणखी दोन वृत्तपत्रे चालवली.

अशाप्रकारे, ब्रिटिश काळात वृत्तपत्रे ही केवळ राजकीय घटना प्रसारित करण्याचेच नव्हे, तर सामाजिक प्रबोधनाची साधने म्हणूनही काम करत होती.

**२. नकाशे आणि आराखडे ही इतिहासाची महत्त्वाची साधने मानली जातात.**

**उत्तर:**

i. वेगवेगळ्या काळी काढलेल्या शहरांच्या वेगवेगळ्या नकाशांमुळे शहरांचे किंवा एखाद्या विशिष्ट स्थानाचे बदलते स्वरूप लक्षात यायला मदत होते. याद्वारे आपल्याला त्या शहराचा किंवा स्थानाचा इतिहास समजतो.

ii. 'द सर्व्हे ऑफ इंडिया' या ब्रिटिश काळात स्थापन झालेल्या स्वतंत्र विभागाने भारताचे, भारतातील विविध प्रांतांचे, शहरांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षण करून नकाशे तयार केले.

iii. त्याचप्रमाणे, वास्तुविशारदांनी तयार केलेले आराखडे हे इमारत स्थापत्यशास्त्राच्या, तसेच एखाद्या ठिकाणच्या विकासाची प्रक्रिया समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती देतात.

iv. उदा. मुंबई पोर्ट ट्रस्टच्या विभागात वास्तुविशारद आणि अभियंत्यांनी तयार केलेल्या मुंबई बंदराच्या मूळ आराखड्यांवरून आपल्याला मुंबई शहराच्या विकासाची माहिती मिळू शकते.

म्हणूनच, नकाशे आणि आराखडे यांना इतिहासाची महत्त्वाची साधने मानले जाते.

**३. स्फूर्तिगीते ही इतिहासाची महत्त्वाची साधने आहेत.**

**उत्तर:**

i. स्वातंत्र्यचळवळी दरम्यान विविध प्रकारच्या स्फूर्तिगीतांची रचना करण्यात आली.

ii. यातील काही गीते ही लिखित स्वरूपात उपलब्ध आहेत, तर अनेक गीते जी स्वातंत्र्य सैनिकांनी मुखोद्‌गत केली होती, ती अप्रकाशित राहिली.

iii. या स्फूर्तिगीतांमधून स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थितीची माहिती मिळते.

iv. या गीतांमधून स्वातंत्र्य चळवळीमागील प्रेरणा समजायलाही मदत होते.

अशाप्रकारे, स्फूर्तिगीते ही इतिहास समजून घेण्यासाठी महत्त्वाची साधने ठरतात.

***४. चित्रफिती या आधुनिक भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात अतिशय विश्वसनीय साधने मानली जातात.**

**उत्तर:**

i. आधुनिक काळातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे छायाचित्रण, ध्वनिमुद्रण, चित्रपट इत्यादी कलांचा विकास झाला.

ii. चित्रपट हा आधुनिक तंत्रज्ञानाचा एक आगळावेगळा शोध मानला जातो. हे इतिहासाचे एक महत्त्वाचे दृक-श्राव्य साधन आहे.

iii. विसाव्या शतकात चित्रपट निर्मिती तंत्रज्ञानात फार मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली.

iv. इ. स. १९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी भारतीय चित्रपटसृष्टीची मुर्हूतमेढ रोवली.

v. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील दांडी यात्रा, मिठाचा सत्याग्रह, चलेजाव चळवळ यांसारख्या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांच्या ध्वनी चित्रफिती उपलब्ध आहेत.

vi. या चित्रफितींच्या माध्यमातून गतकाळातील घटना जशीच्या तशी पाहायला मिळते.

म्हणून, चित्रफिती या आधुनिक भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात अतिशय विश्वसनीय साधने मानली जातात.

**५. प्राचीन आणि मध्ययुगीन काळाच्या तुलनेत आधुनिक भारताच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी विपुल प्रमाणात साधने उपलब्ध आहेत.**

**उत्तर:** प्राचीन आणि मध्ययुगीन काळाच्या तुलनेत आधुनिक भारताच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी विपुल प्रमाणात साधने उपलब्ध आहेत, कारण :

i. आधुनिक काळातील पुरातत्त्व शास्त्रीय साधने ही प्राचीन आणि मध्ययुगीन साधनांच्या तुलनेत बऱ्यापैकी सुस्थितीत आहेत.

ii. यापैकी बहुतांश साधने ही लिखित स्वरूपात असून अभिलेखागारात जतन करून ठेवली आहेत. मात्र, लिखित स्वरूपातील साधनांचा वापर करताना लेखकाची विचारधारा आणि एखाद्या घटनेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन तपासून घेणे आवश्यक आहे.

iii. तसेच, आधुनिक काळातील काही साधने ही दृक, श्राव्य आणि दृक-श्राव्य स्वरूपात उपलब्ध आहेत. ही साधनेही अभिलेखागारात जतन करून ठेवली जातात.

iv. ही सर्व साधने एका विशिष्ट कालखंडातील भिन्न राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती समजून घेण्यास मदत करतात.

### ज्ञानाचे उपयोजन करा.

**१. करून पहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २)

**तुमच्या नजीकच्या परिसरात असणारी स्मारके आणि पुतळे यांविषयी माहिती मिळवा. त्यावरून तुम्हांला त्या घटनेची अथवा व्यक्तीविषयी कोणती माहिती मिळते याची नोंद करा.**

[**टीप :** विद्यार्थ्यांनी वरील कृती स्वत: करावी.]

**२. करून पहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३)

**भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळाशी संबंधित स्फूर्तिगीतांचा व पोवाड्यांचा संग्रह करा व त्यांचे सादरीकरण करा.**

[**टीप:** विद्यार्थ्यांनी वरील कृती स्वत: करावी.]

### उपक्रम

***१. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विविध घटनांच्या छायाचित्रांचा आंतरजालाच्या साहाय्याने संग्रह करा.**

[**टीप:** विद्यार्थ्यांनी आंतरजालाच्या (इंटरनेट) साहाय्याने वरील उपक्रम स्वत: करावा.]

Sample Content

*२. **स्वातंत्र्यलढ्यातील प्रसिद्ध नेते आणि त्यांची चरित्रे यांविषयी माहिती मिळवून त्यांचे वाचन करा.**

**उत्तर:** भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील काही महत्त्वाचे नेते म्हणजे महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक, सरदार वल्लभभाई पटेल, लाल बहादूर शास्त्री, डॉ. राजेंद्र प्रसाद. लाला लजपत राय आणि इतर.

येथे, आपण लोकमान्य टिळक या थोर नेत्याची माहिती जाणून घेणार आहोत.

**बाळ गंगाधर टिळक :**

**जन्म दिनांक :** २३ जुलै १८५६

**जन्म स्थळ :** रत्नागिरी, महाराष्ट्र

**पालक :** गंगाधर टिळक (वडील) आणि पार्वतीबाई (आई)

**पत्नी :** तापीबाई नंतर नाव बदलून सत्यभामाबाई

**शिक्षण :** डेक्कन कॉलेज, शासकीय विधी महाविद्यालय

**संघटना :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, इंडियन होम रूल लीग, डेक्कन एज्युकेशन सोसायटी.

**चळवळ :** भारतीय स्वातंत्र्य चळवळ

**राजकीय मतप्रवाह :** राष्ट्रीयवादी, जहाल मतवादी

**धार्मिक श्रद्धा :** हिंदुत्व

**प्रकाशन :** द आर्क्टिक होम इन द वेदाज (१९०३); गीता रहस्य (१९१५)

**निर्वतले :** १ ऑगस्ट १९२०

**स्मारक :** टिळक वाडा, रत्नागिरी, महाराष्ट्र

बाळ गंगाधर टिळक हे आधुनिक भारताच्या प्रमुख शिल्पकारांपैकी एक होते. तसेच, 'स्वराज्य' म्हणजे भारताचे स्वत:चे शासन या संकल्पनेचे प्रखर पुरस्कर्तेही होते. त्यांची 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच' या इतिहासात अजरामर झालेल्या घोषणेने भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील भावी क्रांतिकारकांना प्रेरणा दिली. ब्रिटिश सरकारने त्यांना "भारतीय असंतोषाचे जनक" असे संबोधले होते, तर त्यांच्या समर्थकांनी त्यांना 'लोकमान्य' हे शीर्षक बहाल केले. याचा अर्थ लोकांनी आदर केलेला असा होतो. टिळक हे उत्कृष्ट राजकारणी तसेच विद्वान होते. त्यांची स्वातंत्र्य ही देशाच्या कल्याणासाठी सर्वप्रथम गरज आहे, अशी ठाम श्रद्धा होती.

**बालपण आणि सुरुवातीचा काळ :**

केशव गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै, १८५६ रोजी दक्षिण - पश्चिम महाराष्ट्रातील रत्नागिरीतल्या एका मध्यमवर्गीय चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील गंगाधर शास्त्री हे संस्कृतचे विद्वान आणि रत्नागिरीतील शाळेत शिक्षक होते. त्यांच्या आईचे नाव पार्वतीबाई होते. त्यांच्या वडिलांच्या बदलीनंतर टिळक कुटुंब पुण्यास गेले. १८७१, मध्ये टिळकांचा विवाह तापीबाई यांच्याशी झाला. ज्यांचे नंतर सत्यभामाबाई असे नामकरण करण्यात आले.

टिळकांचे शिक्षण पुण्यातील डेक्कन कॉलेज येथे झाले. जिथे १८७६ मध्ये त्यांनी गणित आणि संस्कृतची पदवी प्राप्त केली. टिळकांनी नंतर कायद्याचा अभ्यास सुरू केला. आणि १८७९ मध्ये बॉम्बे (आताचे मुंबई) विद्यापीठातून कायद्याची पदवी मिळवली. त्यावेळी मात्र त्यांनी पुण्यातील एका खासगी शाळेत गणित विषय शिकवण्याचा निर्णय घेतला आणि हीच शाळा त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा पाया ठरली. त्यांनी १८८४ मध्ये 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची उभारणी केली. या संस्थेचा उद्देश विशेषकरून इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करणे हा होता. त्यांच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मते इंग्रजी हे उदारमतवादी आणि लोकशाही आदर्शाच्या प्रसाराचे मुख्य साधन होते.

**राजकीय कारकीर्द :**

**राष्ट्रीय सभा:**

१८९० मध्ये टिळकांनी राष्ट्रीय सभेत प्रवेश केला. त्यांनी स्वशासनाबाबतच्या पक्षातील मवाळवादी विचारांचा कडाडून विरोध केला. ब्रिटिशांच्या विरुद्ध केवळ घटनेच्या चौकटीत राहून केलेला विरोध हा निरर्थक आहे असे त्यांचे ठाम मत होते. यामुळे, काँग्रेसचे प्रमुख नेते गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विरोधात ते उभे राहिले.

विचारसरणीच्या या मूलभूत फरकामुळे टिळक आणि त्यांचे समर्थक हे जहालमतवादी म्हणून काँग्रेस पक्षात ओळखले जाऊ लागले.

बंगालचे बिपिन चंद्रपाल, पंजाबचे लाला लजपत राय या त्यांच्या राष्ट्रवादी समर्थकांनी त्यांच्या प्रयत्नांना साथ दिली. या तिघांना लाल - बाल - पाल असे संबोधले जात असे.

**तुरुंगवास:**

१८९६ च्या प्लेगच्या महामारीच्या वेळेस पुण्यात ब्रिटिशांच्या दडपशाही भूमिकेचा आपल्या वृत्तपत्रांतून जाहीर विरोध केल्याने ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला दाखल केला आणि त्यांना जवळजवळ ६ वर्षे मंडाले, ब्रह्मदेश (म्यानमार) येथे तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

**टिळक आणि अखिल भारतीय होमरूल लीग संघटना:**

१९१४ मध्ये तुरुंगातून मुक्त झाल्यावर जग पहिल्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असताना टिळक पुन्हा राजकारणात सक्रिय झाले. त्यांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच". या घोषणेवर आधारित होमरूल लीग चळवळ सुरू केली.

Sample Content

**वर्तमानपत्रे:**

टिळकांनी 'केसरी' हे मराठी वृत्तपत्र तर 'मराठा' हे इंग्रजी वृत्तपत्र अशी दोन वृत्तपत्रे सुरू केली.

**मृत्यू :**

जालियनवाला बाग हत्याकांडाच्या घटनेने लोकमान्य टिळक इतके व्यथित झाले, की त्यांची तब्येत ढासळू लागली. आपल्या तब्येतीची पर्वा न करता त्यांनी भारतीयांना कोणत्याही परिस्थितीत चळवळ न थांबवण्याचे आवाहन केले. त्यांची स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करण्याची इच्छा होती; परंतु तब्येतीच्या कारणाने ते शक्य झाले नाही. त्यांना मधुमेहाने ग्रासले होते आणि या काळात ते खूप अशक्त झाले. जुलैच्या मध्यात त्यांची तब्येत अतिशय ढासळली आणि १ ऑगस्ट १९२० रोजी त्यांचे निधन झाले.

**वारसा :**

लोकमान्य टिळक हे त्यांच्या काळातील अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. एक महान वक्ता, एक बलशाली नेता ज्याने भारतीयांना प्रेरणा दिली. टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव हा आज महाराष्ट्रात आणि जवळच्या राज्यांतील प्रमुख उत्सव आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक विलक्षण असामान्य व्यक्तिमत्त्व म्हणून टिळकांचा अनेक चरित्रांमध्ये समावेश आहे. टिळकांनी सुरू केलेले मराठी वृत्तपत्र आजही चलनात आहे.

**संदर्भ सौजन्य :**

१. *https://www.britannica.com/biography/Bal-Gangadhar-Tilak*

२. *https://www.culturalindia.net/leaders/bal-gangadhar-tilak.html]*

**त्यांच्यावरील पुस्तके :** बायोग्राफी ऑफ बाळ गंगाधर टिळक (इंग्लिश, पेपरबॅक आर पी एच एडिटोरियल)

**[टीप:** येथे एका नेत्याच्या चरित्राची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. याच धर्तीवर विद्यार्थी आंतरजालावरून आणि वाचनालयातून इतर नेते आणि त्यांच्या चरित्रविषयक माहिती मिळवू शकतात.**]**

पाठाची उजळणी पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

Sample Content

# नागरिकशास्त्र

Sample Content

# १ संसदीय शासन पद्धतीची ओळख

| संकल्पना / पारिभाषिक शब्द | |
|---|---|
| संविधान | देशातील राज्यसंस्थेच्या सनदशीर राज्यपद्धतीविषयक मूलभूत तत्त्वांनुसार तयार केलेला नियमावलींचा मसुदा किंवा संहिता. |
| अविश्वासाचा ठराव | लोकभेतील विरोधी सदस्य सत्तेतील सरकार किंवा मंत्री परिषदेच्या कारभाराबाबत विश्वास नसल्यास अविश्वासाचा ठराव लोकसभेमध्ये मांडतात. |
| संविधान सभा | संविधान तयार करण्यासाठी करण्यात आलेली समिती किंवा लोकांचा गट. |

## पाठाचा परिचय

**शासनसंस्थेच्या प्रमुख शाखा**

| | कायदेमंडळ | कार्यकारी मंडळ | न्यायमंडळ |
|---|---|---|---|
| कार्य | कायद्यांची निर्मिती करणे. | कायद्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे. | न्याय देणे. |

**शासनपद्धतीचे प्रमुख दोन प्रकार**

संसदीय शासनपद्धती | अध्यक्षीय शासनपद्धती

**संसदीय शासनपद्धती**

- सर्वप्रथम इंग्लंडमध्ये विकसित झाली.
- राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा मिळून संसद तयार होते.
- लोकसभेतील प्रतिनिधींची जनतेकडून निवडणुकीद्वारे थेट निवड केली जाते.
- प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ मिळून कार्यकारी मंडळ तयार होते.
- भारतात संसदीय शासनपद्धती आहे.

**अध्यक्षीय शासनपद्धती**

- राष्ट्राध्यक्ष हा कार्यकारी प्रमुख म्हणून जनतेकडून निवडला जातो.
- कार्यकारी मंडळ कायदेमंडळापासून अलिप्त असते.
- अमेरिकेत अध्यक्षीय शासनपद्धती आहे.

- याव्यतिरिक्त, विविध देश आपल्या परिस्थितीनुरूप अन्य शासनपद्धतीचां अवलंब करताना दिसतात.

## दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

*१. संसदीय शासन पद्धती ________ येथे विकसित झाली.
अ. इंग्लंड ब. फ्रान्स
क. अमेरिका ड. नेपाळ

२. ________ या देशाचे संविधान अलिखित आहे.
अ. भारत
ब. इंग्लंड
क. अमेरिकेची संयुक्त संस्थाने
ड. फ्रान्स

३. प्रधानमंत्री व त्यांनी निवडलेले मंत्रिमंडळ हे संसदीय शासन पद्धतीतील ________ मंडळ होय.
अ. न्याय
ब. संसद
क. कार्यकारी
ड. कायदे

Sample Content

*४. अध्यक्षीय शासन पद्धतीत ________ हे कार्यकारी प्रमुख असतात.

अ. प्रधानमंत्री  ब. लोकसभा अध्यक्ष

क. राष्ट्राध्यक्ष  ड. राज्यपाल

**उत्तर:** १. इंग्लंड  २. इंग्लंड

३. कार्यकारी  ४. राष्ट्राध्यक्ष

## तक्ता पूर्ण करा.

*१.

| अ.क्र. | मंडळाचे नाव | कार्ये |
|---|---|---|
| i. | कायदेमंडळ | |
| ii. | कार्यकारी मंडळ | |
| iii. | न्यायमंडळ | |

**उत्तर:**

| अ.क्र. | मंडळाचे नाव | कार्ये |
|---|---|---|
| i. | कायदेमंडळ | **कायद्यांची निर्मिती करणे** |
| ii. | कार्यकारी मंडळ | **कायद्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे** |
| iii. | न्यायमंडळ | **न्याय देणे** |

## एका वाक्यात उत्तरे लिहा.

**१. कायदेमंडळ कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांचे अधिकारक्षेत्र व परस्परसंबंध कोण ठरवते?**

**उत्तर:** कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांचे अधिकारक्षेत्र व त्यांच्यावरील मर्यादा आणि या तीनही शाखांचे परस्परांमधील संबंध संविधान ठरवते.

**२. शासनपद्धतीचे दोन प्रकार सांगा.**

**उत्तर:** संसदीय शासनपद्धती व अध्यक्षीय शासनपद्धती हे शासन पद्धतीचे दोन प्रकार आहेत.

**३. निवडणुकीनंतर कोणता पक्ष सरकार बनवतो?**

**उत्तर:** निवडणुकीनंतर ज्या पक्षाला निम्म्यापेक्षा जास्त जागा मिळतात, तो पक्ष बहुमतातला पक्ष मानला जातो आणि हा पक्ष सरकार बनवतो.

**४. आघाडी सरकार म्हणजे काय?**

**उत्तर:** संसदीय शासनपद्धतीमध्ये निवडणुकीत काही वेळेस कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट असे बहुमत न मिळाल्यास काही पक्ष एकत्र येऊन आपले बहुमत सिद्ध करतात व त्यांना सरकार स्थापन करता येते. याला आघाडी सरकार असे म्हणतात.

**५. संसदीय शासनपद्धतीमध्ये मंत्रिमंडळाची निवड कोण करतो?**

**उत्तर:** संसदीय शासनपद्धतीमध्ये प्रधानमंत्री मंत्रिमंडळाची निवड करतो.

**६. संसदीय किंवा अध्यक्षीय शासनपद्धती या दोन्हीपैकी एकाही शासनपद्धतीचा अवलंब करत नसलेल्या जगातील देशांची नावे सांगा.**

**उत्तर:** फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी इत्यादी जगातील काही देश आहेत, जेथे संसदीय किंवा अध्यक्षीय शासनपद्धती या दोन्हीपैकी एकाही शासनपद्धतीचा अवलंब केला जात नाही.

**७. विविध देशांमध्ये संसदीय किंवा अध्यक्षीय शासनपद्धतीं व्यतिरिक्त अन्य काही शासनपद्धतींचा अवलंब का करताना दिसतात?**

**उत्तर:** विविध देशांमध्ये परिस्थिती वेगळी असून ते आपल्या परिस्थितीला अनुरूप अशा प्रकारच्या शासनपद्धतीचा अवलंब करताना दिसतात; ज्या संसदीय किंवा अध्यक्षीय शासनपद्धतीपेक्षा वेगळ्या आहेत.

## थोडक्यात उत्तरे लिहा. (२५ ते ३० शब्दांत)

**१. इंग्लंडमधील पार्लमेंटविषयक थोडक्यात लिहा.**

**उत्तर:**

i. संसदीय शासनपद्धती ही मुख्यत: इंग्लंडमध्ये विकसित झाली.

ii. तेथे अलिखित संविधान असून आजदेखील बराचसा राज्यकारभार रूढ संकेतांच्या आधारे चालतो.

iii. पार्लमेंट ही संस्था इंग्लंडमध्ये उत्क्रांत झालेली संस्था आहे.

iv. पार्लमेंटवर आधारलेली पार्लमेंटरी शासनपद्धती हे इंग्लंडचे योगदान मानले जाते.

**२. लोकसभेची ठळक वैशिष्ट्ये कोणती?**

**उत्तर:** लोकसभेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

i. लोकसभा हे संसदेचे एक सभागृह असून यातील प्रतिनिधी जनतेकडून थेटपणाने निवडले जातात.

ii. लोकसभा सदस्यांची संख्या निश्चित असते.

iii. लोकसभेच्या निवडणुका ठरावीक मुदतीनंतर होतात.

iv. या निवडणुका सर्व राजकीय पक्ष लढवतात.

**३. संसदीय शासनपद्धतीमध्ये कार्यकारी मंडळ कोणती भूमिका पार पाडते?**

**उत्तर:** संसदीय शासनपद्धतीमध्ये कार्यकारी मंडळावर दुहेरी जबाबदारी असते.

i. कार्यकारी मंडळ म्हणून त्यांना कायद्यांची अंमलबजावणी करावी लागते.

ii. तसेच, हे कायदेमंडळाचेही सदस्य असल्याने त्यांना कायदेमंडळासंबंधित जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागतात.

Sample Content

***४. जबाबदार शासनपद्धती म्हणजे काय?**

**उत्तर:**

i. संसदीय शासनपद्धतीच्या प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ आपल्या सर्व कृती आणि धोरणांसाठी कायदेमंडळाला जबाबदार असतात आणि ही सामूहिक जबाबदारी असते.

ii. मंत्रिमंडळाला कायदेमंडळाला बरोबर घेऊन राज्यकारभार करावा लागतो.

iii. एखाद्या खात्याचा निर्णय हा राज्याचा निर्णय मानला जातो आणि या निर्णयाची जबाबदारी संपूर्ण मंत्रिमंडळाची असते.

म्हणूनच, संसदीय शासनपद्धतीला जबाबदार शासनपद्धती म्हटले जाते.

**५. संसदीय शासनपद्धतीत संसद किंवा कायदेमंडळ का श्रेष्ठ असते?**

**उत्तर:**

i. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सामान्य जनतेच्या अपेक्षा संसदेमध्ये व्यक्त करतात.

ii. लोकहिताकरता काय केले जावे हे संसद ठरवते.

iii. हे लोकप्रतिनिधींचे सभागृह असून येथे जनतेचा सर्वश्रेष्ठ अधिकार व्यक्त केला जातो.

म्हणूनच, संसदीय शासनपद्धतीत संसद किंवा कायदेमंडळ श्रेष्ठ असते.

***६. अध्यक्षीय शासनपद्धतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर:** अध्यक्षीय शासनपद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

i. अध्यक्षीय शासनपद्धतीमध्ये कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ थेटपणे परस्परांवर अवलंबून नसतात.

ii. कायदेमंडळाची दोन्ही सभागृहे, तसेच राष्ट्राध्यक्ष हे जनतेकडून निवडले जातात.

iii. राष्ट्राध्यक्ष हे कार्यकारी प्रमुख असतात आणि त्यांच्या हाती कायद्यांच्या अंमलबजावणीसह अन्य अनेक अधिकार असतात.

iv. कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ परस्परांवर नियंत्रण ठेवते. यामुळे, जबाबदार पद्धतीने राज्यकारभार होऊ शकतो.

## टीप लिहा.

**१. भारतीय संसदीय शासनपद्धतीची वैशिष्ट्ये**

**उत्तर:**

i. केंद्रीय शासन यंत्रणेच्या कायदेमंडळाला संसद असे म्हटले जात असून राष्ट्रपती, लोकसभा आणि राज्यसभा मिळून संसद तयार होते.

ii. संसदेच्या लोकसभेतील प्रतिनिधी जनतेकडून थेटपणाने निवडले जातात. या सभागृहातील सदस्यांची संख्या निश्चित असते.

iii. लोकसभेच्या निवडणुका ठरावीक मुदतीनंतर होतात आणि या निवडणुका सर्व राजकीय पक्ष लढवतात. यामध्ये ज्या राजकीय पक्षाला निम्म्यापेक्षा जास्त जागा मिळतात, तो बहुमतातला पक्ष मानला जातो आणि हा पक्ष सरकार बनवतो.

iv. काही वेळा कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट असे बहुमत मिळत नाही, अशावेळेस काही पक्ष एकत्र येऊन आपले बहुमत सिद्ध करतात व त्यांना सरकार स्थापन करता येते. यालाच आघाडी सरकार असे म्हणतात.

v. अशारीतीने, जनतेकडून निवडून आलेले प्रतिनिधी कायदेमंडळांचे सभासद होतात व बहुमतात असलेल्या पक्षाला आपले सरकार स्थापन करता येते.

vi. या बहुमतातल्या पक्षाचा नेता प्रधानमंत्री होतो आणि तो आपल्या सहकाऱ्यांची मंत्रिपदाकरता निवड करतो.

vii. प्रधानमंत्री व त्यांनी निवडलेले मंत्रिमंडळ हे संसदीय शासनपद्धतीत कार्यकारी मंडळ असते.

## पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**१. अविश्वासाचा ठराव हे कार्यकारी मंडळावरील नियंत्रणाचे एक प्रभावी साधन आहे.**

**उत्तर:**

i. प्रधानमंत्री व त्यांनी निवडलेले मंत्रिमंडळ हे संसदीय शासनपद्धतीतील कार्यकारी मंडळ असते.

ii. हे कार्यकारी मंडळ कायदेमंडळाच्या विश्वासावर अवलंबून असते.

iii. जोपर्यंत कायदेमंडळाचा कार्यकारी मंडळाला पाठिंबा असतो किंवा संमती असते तोपर्यंतच कार्यकारी मंडळ अधिकारावर राहते.

iv. संसद किंवा कायदेमंडळाला जर असे वाटले, की आपल्या इच्छेनुसार कार्यकारी मंडळ कार्य करत नाही तेव्हा संसद अविश्वासाचा ठराव मांडून कार्यकारी मंडळाला सत्तेपासून दूर करते.

म्हणूनच, अविश्वासाचा ठराव हे कार्यकारी मंडळावरील नियंत्रणाचे एक प्रभावी साधन आहे.

***२. भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला.**

**उत्तर:**

i. संसदीय शासनपद्धती इंग्लंडमध्ये सर्व प्रथम विकसित झाली.

ii. भारतातही ब्रिटिश राजवटीच्या काळातच संसदीय संस्थांची निर्मिती झाली होती. ब्रिटिशांनी या पद्धतीने राज्यकारभार करण्यास सुरुवात केली होती.

iii. संसदीय शासनपद्धती हासुद्धा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक अविष्कार आहे, त्यामुळे भारतीयांना या पद्धतीचा परिचय झाला होता.

म्हणूनच, भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला. यासाठी संविधान सभेत या पद्धतीवर चर्चा करून भारतीय परिस्थितीला अनुकूल असे बदल संविधानकर्त्यांनी केले.

Sample Content

***३. संसदीय शासनपद्धतीत चर्चा व विचारविनिमय महत्त्वाचे असते.**

**उत्तर:**

i. संसदेमध्ये सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर चर्चा होते.

ii. या चर्चेत विरोधी पक्षाचे सभासददेखील भाग घेतात.

iii. योग्य ठिकाणी शासनाला सहकार्य करणे, धोरणातील किंवा कायद्यातील त्रुटी दाखवून देणे, प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी करणे इत्यादी बाबी विरोधी पक्ष करू शकतात.

iv. यामुळे, संसदेला अधिक निर्दोष कायदे करणे शक्य होते.

म्हणूनच, संसदीय शासनपद्धतीत चर्चा व विचारविनिमय महत्त्वाचे असते.

## मुक्तोत्तरी प्रश्न

***१. विरोधी पक्षांची भूमिका महत्त्वपूर्ण का असते? याबाबत तुमचे मत लिहा.**

**उत्तर:**

i. संसदीय शासनपद्धतीमध्ये विरोधी पक्षालाही महत्त्वाचे स्थान आहे.

ii. मंत्रिमंडळाने जनतेसाठी निश्चित केलेल्या धोरणांबाबत किंवा कायद्याबाबतच्या त्रुटी दाखवून, प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी करून सत्तारूढ पक्षाच्या कारभारावर नियंत्रण विरोधी पक्ष करू शकतो.

iii. सत्तारूढ पक्ष लोकहिताच्या दृष्टीने काम करत आहे किंवा नाही, याबाबत विरोधी पक्ष सातत्याने लक्ष देत असतो. याबाबतचे मूल्यमापन करत असतो.

iv. संसद हे लोकप्रतिनिधींचे सभागृह असल्याने लोकहिताच्या दृष्टीने निर्णय घेण्यात सत्तारूढ पक्षाबरोबरच विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वाची ठरते.

## ज्ञानाचे उपयोजन करा.

**१. हे प्रश्न तुम्हांलाही पडले आहेत का?**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ६८)

**i. संसदीय शासन पद्धती म्हणजे काय?**

**ii. भारताचे प्रधानमंत्री आहेत; पण अमेरिकेचे प्रधानमंत्री का नाहीत?**

**iii. संसदीय शासन पद्धती आणि अध्यक्षीय शासनपद्धती यांत काय फरक आहे?**

**उत्तर:**

i. लोकांनी किंवा जनतेने निवडलेल्या प्रतिनिधींच्या सभागृहाद्वारे म्हणजेच संसदेद्वारे चालवल्या जाणाऱ्या राज्यकारभार पद्धती ही संसदीय शासनपद्धती होय.

ii. अ. भारतामध्ये संसदीय शासनपद्धती अस्तित्वात आहे. यामध्ये, प्रधानमंत्री मुख्य नेता असून प्रधानमंत्री व त्यांनी निवडलेले मंत्रिमंडळ हे कार्यकारी मंडळ असते.

ब. अमेरिकेत अध्यक्षीय शासनपद्धती अस्तित्वात आहे. यात कार्यकारी प्रमुख म्हणून राष्ट्राध्यक्ष जनतेकडून थेट निवडला जातो.

iii.

| | संसदीय शासनपद्धती | अध्यक्षीय शासनपद्धती |
|---|---|---|
| अ. | संसदीय शासनपद्धतीत प्रधानमंत्री व त्यांनी निवडलेले मंत्रिमंडळ हे कार्यकारी मंडळ असून प्रधानमंत्री याचा प्रमुख असतो. | अध्यक्षीय शासनपद्धतीमध्ये राष्ट्राध्यक्ष हा कार्यकारी प्रमुख असतो. |
| ब. | प्रधानमंत्र्यांची निवड थेट जनतेकडून होते. | अध्यक्षाची निवड थेट जनतेकडून होते. |
| क. | संसदीय शासनपद्धतीच्या तीन शाखांमध्ये परस्परसंबंध असतो. | अध्यक्षीय शासन पद्धतीतील तीनही शाखा एकमेकांपासून स्वतंत्र असतात; परंतु त्यांच्या कार्यात एकसूत्रता येईल इतपत त्यांचे संबंधही असतात. |

## उपक्रम

***१. दूरदर्शन या राष्ट्रीय वाहिनीवरील लोकसभेच्या व राज्यसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण पाहून त्याची निरीक्षणे लिहा.**

**उत्तर:** पुढील मुद्द्यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना सदर उपक्रम करता येईल.

i. कामकाजाची सुरुवात कोण करतो?

ii. लोकसभा अध्यक्ष / राज्यसभेचे सभापती कोण आहेत?

iii. सभागृहामध्ये सत्तारूढ पक्ष व विरोधी पक्षाची आसनव्यवस्था

iv. सभागृहातील चर्चा व वाद अध्यक्ष किंवा सभापती कशारीतीने हाताळतात?

पाठाची उजळणी पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VIII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History and Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**NOTES**
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

**WORKBOOK**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- My English Book
- मराठी बालभारती

## AVAILABLE BOOKS FOR STD. IX:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

**NOTES**
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान

**WORKBOOK**
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती




Also Available
Hindi Grammar & Writing Skills Books
For Std 8th & 9th

**OUR PRODUCT RANGE**

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

**Visit Our Website**


**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org





Explore our range of STATIONERY